# ‘धनगरी फेटा’च्या शोधाने शिरपेचात नवा तुरा

## राजापूर तालुक्यातील जांभ्या दगडाच्या कातळावरील डबक्यामध्ये आढळली नवी फूलवनस्पती

**राजेंद्र बाईत** : सकाळ वृत्तसेवा

**राजापूर, ता. १०** : राजापूर तालुक्यातील जांभ्या दगडाच्या कातळावरील डबक्यामध्ये फुलणाऱ्या एरिओकॅलॉन रयतीयनम चांदोरे, बोरुडे अँड एस. आर. यादव या जागतिकस्तरीय नव्या फूलवनस्पतीचा शोध लागला आहे. या फूलवनस्पतीला ‘धनगरी फेटा’ असे म्हटले जाते. या नव्या संशोधनामुळे तालुक्याच्या कातळ परिसरामध्ये दुर्मिळ वनस्पतींचा खजिना असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले आहे. नव्याने संशोधित झालेली फूलवनस्पती तालुक्यातील कोबे, साखर, करेल आणि आडिवरे परिसरातील कातळावरील डबक्यामध्ये आढळते.


तालुक्याच्या पश्चिम भागात कातळासह जंगलात विविध दुर्मिळ वनस्पतींचा खजिना असल्याचे गेल्या काही वर्षांमध्ये स्पष्ट झाले आहे. त्यामध्ये एका नव्या वनस्पतीची भर पडली आहे. कातळात डबक्यामध्ये फुललेली नावीन्यपूर्ण वनस्पती डॉ. एस. आर. यादव यांच्यासह आबासाहेब मराठे महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागाचे सहायक प्राध्यापक डॉ. अरुण चांदोरे आणि सहकाऱ्यांच्या निदर्शनास आली. शिवाजी विद्यापीठाचे वनस्पतीशास्त्र विभागातील शास्त्रज्ञ व डॉ. एस. आर. यादव यांच्यासह डॉ. चांदोरे, संशोधक विद्यार्थी देवीदास बोरुडे, प्रतीक नाटेकर, नीलेश माधव यांनी या फूलवनस्पतीवर गेली तीन वर्षे संशोधन केले. ही नवीन फूलवनस्पती जगासमोर आणली आहे. न्यूझीलंडमधून प्रकाशित होणाऱ्या ‘फायटोटॅकसा’ या जागतिक दर्जाच्या नियतकालिकाने या फूलवनस्पतीच्या संशोधनाची दखल घेतली. नऊ सप्टेंबरला प्रसिद्ध झालेल्या अंकामध्ये नव संशोधित जागतिक फूलवनस्पती म्हणून नोंद केल्याची माहिती प्रा. चांदोरे यांनी दिली. या संशोधनामध्ये त्यांना आबासाहेब मराठे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. जी. पवार, प्रा. संतोष मेंगाल, प्रा. नंदकुमार साळुंके, प्रा. विजय देवकर, प्रा. किरण पाटोळे, प्रा. डॉ. विनोदकुमार गोसावी यांचे सहकार्य लाभले.

### रयत शिक्षण संस्थेबद्दल कृतज्ञता

१९१९ मध्ये रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून डॉ. कर्मवीर भाऊसाहेब पाटील यांनी सर्वसामान्य कुटुंबातील मुलांना शिक्षणाची कवाडे खुली केली. ‘रयत शिक्षण संस्थे’ने शताब्दी वर्ष पूर्ण केले आहे. संस्थेच्या आबासाहेब मराठे महाविद्यालयात प्रा. डॉ. अरुण चांदोरे गेली सहा वर्षे वनस्पतीशास्त्र विभागामध्ये सहायक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. अशा संस्थेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी नव्या फूलवनस्पतीचे ‘रयतीयनम’ असे नामकरण करण्यात आले.



**डॉ. यादव**



**डॉ. अरुण चांदोरे**



**देवीदास बोरुडे**



**‘रयतीयनम’ वनस्पतीची पाने, पाण्यात दिसणारे रूप आणि आकर्षक फुले.**

### ठळक वैशिष्ट्ये

- नर, मादी अशी दोन प्रकारची फुले
- झाडाची उंची २५ ते ४५ सेंटीमीटर (खोल पाण्यात ६० सेंटीमीटरपर्यंत)
- पाने ५ ते ८ सेंटीमीटर
- फुलांचा गुच्छ ७ ते ८ मिलिमीटर
- जगात ४००, भारतात १०५ प्रजाती

# ‘समाज परिवर्तनासाठी शिक्षकांनी संशोधन करावे’

म. टा. वृत्तसेवा, हातकणंगले

‘शिक्षकांनी समाज परिवर्तनासाठी संशोधन करावे’ असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील लोकविकास केंद्राच्या संचालिका डॉ. मंजुषा देशपांडे यांनी केले. पेठवडगाव येथील विजयसिंह महाविद्यालयात त्या बोलत होत्या.

प्राचार्य डॉ. विजय चव्हाण यांच्या संकल्पनेतून शिक्षकांसह कर्मचाऱ्यांचा सत्कार झाला. शिक्षकाची भूमिका स्पष्ट असावी यासाठी कार्यक्रमांची गरज आहे असे मत डॉ. चव्हाण यांनी अध्यक्षीय मनोगतावेळी व्यक्त केले. प्रा. चंद्रकांत माने यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सचिन पवार यांनी पाहूण्यांची ओळख करून दिली. डॉ. नाझीम शेख, प्रा. डी. जी. जगताप, प्रा. रसिका पेठकर यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. आर. आर. चव्हाण, प्रा. अजिंक्य कुंभार यांनी सूत्रसंचालन केले.



विजयसिंह महाविद्यालयातील कार्यक्रमात डॉ. मंजुषा देशपांडे यांचा सत्कार करताना प्राचार्या डॉ. विजया चव्हाण. शेजारी प्रा. चंद्रकांत माने.



कोल्हापूर : कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचा सत्कार करताना किशनराव कल्याणकर. शेजारी इतर मान्यवर.

# पूरस्थितीत कुलगुरू डॉ. शिंदे यांचे कार्य गौरवास्पद : कल्याणकर

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** पूरस्थितीत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली माणुसकीचे खऱ्या अर्थाने शिक्षण दिले, असे गौरवोद्गार सामाजिक कार्यकर्ते किसनराव कल्याणकर यांनी काढले. बी वॉर्ड अन्याय कृती समिती, हुतात्मा क्रांती सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक दिनानिमित्त सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. यावेळी प्र.कुलगुरू डॉ. टी. डी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, सिनेट सदस्य राम तुपे, अजय आयरेकर, सुरेश पाटील, सतीश पोवार, पृथ्वीराज जगताप, मालोजी केरकर आदींसह सभासद उपस्थित होते.

# भाषा विभागामुळेच रशिया-भारत संबंध दृढ

## डॉ. सकलोव; रशियन भाषेच्या विद्यार्थ्यांशी 'मुक्त संवाद'

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १० : शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभाग हा भारत व रशिया यांच्यातील सांस्कृतिक बंध असून रशियन भाषा अभ्यासक्रमाच्या माध्यमातून हा बंध अधिक दृढ होत असल्याचे प्रतिपादन मॉस्को स्टेट युनिव्हर्सिटीचे प्रा. डॉ. द्मीत्री सकलोव, रशिया यांनी केले. विदेशी भाषा विभागातील रशियन भाषेच्या विद्यार्थ्यांशी 'मुक्त संवाद' या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी डॉ. मार्गारीता रेमीजवा याही उपस्थित होत्या.

याप्रसंगी रशियातील दैनंदिन जीवन, पाककला, कुटुंब व विवाह पद्धती या संदर्भातील अनेक विषयांवर विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना डॉ. द्मीत्री सकलोव यांनी दिलखुलास उत्तरे दिली. राईपासून बनवलेला काळा पाव व कॅव्हिअर म्हणजे खारवलेली माशांची अंडी हे रशियातील लोकांचे आवडते अन्न आहे. त्यांनी खास रशियातून सोबत आणलेली लाकडी बाहुली,



तसेच काळा पाव व कॅव्हिअर या पदार्थांची ओळख त्यांनी विद्यार्थ्यांना करून दिली. त्याच बरोबर सोविएत व उत्तर-सोविएत काळातील जीवन शैलीमधील फरक स्पष्ट केला. रशियन लोकांना भारतातील निसर्ग अतिशय प्रिय असल्याचेही त्यांनी सांगितले. डॉ. मार्गारीता रेमीजवा यांनी आज रशियन स्त्रीने जीवनाच्या सर्व क्षेत्रांत स्वत:चे स्थान निर्माण केले असून रशियन स्त्री हे एक अतिशय कणखर व स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असल्याचे सांगितले. यावेळी विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी सहयोगी शिक्षिका शीतल कुलकर्णी व प्रियांका माळकर उपस्थित होत्या.